Exh. 46

रे. क. नं. ९४/२०२६

**मे. दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, कागल.**
**यांचे कोर्टात.........**

**सचिन लक्ष्मण जानवे** ... **वादी**

**विरुध्द**

**नाना जोती कांबळे, वगैरे** ... **प्रतिवादी**

**मनाईकरीता अर्ज.**

**यातील वादीतर्फे विनंती अर्ज की,**

१) प्रस्तुतचा दावा वादीनी प्रतिवादी विरुध्द कायम मनाई व अज्ञार्थी आदेशाकरीता दाखल केलेला आहे.

Order
O.S. to Say
C.J.J.D.,Kagal.
Date : 04/07/2026

२) प्रस्तुत कामातील प्रतिवादी हे वकीलपत्र दाखल करुन हजर झालेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांना सदर दाव्याचे पूर्ण माहिती व कल्पना आहे. असे असताना, सदर प्रतिवादी नं. १ ते ८२ हे संपूर्णतः बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना वादीचे कायदेशीर हक्क डावलून दावा मिळकतीचे त्रयस्थ इसमांना हस्तांतरण करणेचा खटाटोप करत होते व आहेत. त्याबाबत यातील वादी यांनी संबंधित त्रयस्थ इसमांना वकीलांमार्फत ता. १२/०३/२०२६ इा रोजी नोटीस पाठवलेली आहे. तसेच यातील वादी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुख्यालय, मुंबई यांना ता. ०४/०३/२०२६ इा रोजी सविस्तर कथने करुन तक्रार अर्ज देखील दाखल केलेले आहे.

३) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असताना, यातील प्रतिवादी नं. १ ते ८२ हे बेकायदेशीरपणे वादी यांचेकडून एकूण रक्कम रु. ४,९६,७२,६३३/- इतकी रक्कम स्विकारुन देखील प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना वादी यांचे कायदेशीर हक्क डावलून भरमसाठ जादा रक्कम मिळवणेच्या उद्देशाने

सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर कोल्हापूर.

सदर दावा मिळकतीच्या हस्तांतरणाचा खटाटोप करत होते व आहेत. तसेच यातील वादी यांनी नाम. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, कोल्हापूर यांचेकडे अपिल फ्रॉम ऑर्डर १७/२०२६ चे काम दाखल केलेले होते. सदरकामी मे. न्यायालयाने प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीबाबत त्रयस्थांचे हक्क निर्माण करणेस मनाई आदेश केलेला होता. सदरचा मनाई आदेश आजअखेर अस्तित्वात आहे व सदरचे काम ता. २२/०६/२०२६ इा रोजी मे. कोर्टानी निकाली काढलेले आहे. त्याकारणांने नाम. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ कोल्हापूर यांनी वर नमूद कामी मनाई आदेश पारीत केला असलेने व सदरचा आदेश आजरोजी संपत असलेने प्रस्तुत कामी प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीबाबत मनाईचा आदेश होणे न्यायाचे व आवश्यक आहे.

४) प्रस्तुत कामी वर नमूद प्रमाणे प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीबाबत मनाईचा आदेश झालेस यातील प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होण्याचा न्यायाच्या दृष्टीने संभव देखील नाही. याउलट सदरप्रमाणे मनाईचा आदेश न झालेस वादीचे कायदेशीर हक्क डावलले जाणार असून कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे.

५) न्यायाचे व इक्वीटीच्या दृष्टीनेही प्रस्तुत कामी वर नमूद प्रमाणे दावा मिळकतीबाबत मनाईचा आदेश होणे आवश्यक व अगत्याचे आहे.

६) **<u>सबब, वादीची विनंती की,</u>**

प्रस्तुत कामी यातील प्रतिवादी यांनी वादीचे कायदेशीर हक्क डावलून कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीचे त्रयस्थांना हस्तांतरण करु नये असा नि. ५ च्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादी व तर्फे इसमांविरुध्द मनाईचा आदेश करणेत यावा ही नम्र विनंती.

---

येणेप्रमाणे अर्ज असे.

कोल्हापूर/ कागल

ता. ०४/०७/२०२६

सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर कोल्हापूर.

## अॅफिडेव्हीट

मी यातील वादी नं. २ कुमार चंद्रकांत पाटील, व.व. ४६, धंदा – व्यवसाय, रा. पाटील नगर, नेर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर देवाचे शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले अॅफिडेव्हीट आज मुा कोल्हापूर. ता. ०३/०७/२०२६

मी अॅफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

Gavade Adv.

अॅडव्होकेट

(R.B. Gavade)

Kumar Patil

अॅफिडेव्हीट करणार

## प्रतिज्ञा

मी यातील वादी नं. २ कुमार चंद्रकांत पाटील, व.व. ४६, धंदा – व्यवसाय, रा. पाटील नगर, नेर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व अॅफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा कोल्हापूर. ता. ०३/०७/२०२६

Kumar Patil

दिनांक 03 माहे 07 सन 2026 इ. रोजी
श्री कुमार चंद्रकांत पाटील
व व 46 रा. नेर्ली ता करवीर
यानी माझ्यासमोर गांभीर्यपूर्वक सत्य प्रतिज्ञा कथन पुर्ती केली
यास्तव त्यांची ओळख वकील R B गावडे
यानी दिली आहे. त्याकरिता अभिसाक्षीची स्वाक्षरी या सोबत घेतली आहे
3/7/26
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर कोल्हापूर.

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.07.04 18:17:51 +0530